# महाराष्ट्र शासन
# वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
# वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई
# तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान व अभियांत्रिकी सामाईक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी-२०१०)

**प्रेस नोट** दि. ०६ मे, २०१०

☞ महाराष्ट्र शासनाने आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी व औषध निर्माणशास्त्र या तीनही व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी एमएचटी-सीईटी २०१० ही सामाईक प्रवेश परीक्षा गुरुवार, दिनांक ०६ मे, २०१० रोजी आयोजित करण्यात आली होती.

☞ सदरची प्रवेश परीक्षा महाराष्ट्रातील ३५ जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी एकुण ७४० परीक्षा केंद्रांवर कोणताही अनुचित प्रकार न घडता सुरळीतपणे पार पडली.

☞ सदर प्रवेश परीक्षेच्या वेळा खालीलप्रमाणे होत्या.

| विषय | परीक्षेची वेळ |
|---|---|
| भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र | सकाळी, १०.०० ते ११.३० |
| जीवशास्त्र | सकाळी, १२.०० ते दुपारी, १.३० |
| गणित | दुपारी, ३.०० ते ४.३० |

☞ सदर प्रवेश परीक्षेसाठी खालील प्रमाणे केंद्रांचे वर्गीकरण करण्यात आले होते.

१. फक्त आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी - बी.बी. प्रकारचे केंद्र

२. फक्त अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी - एम.एम. प्रकारचे केंद्र

३. दोन्ही अभ्यासक्रमासाठी बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी - एम.बी.प्रकारचे केंद्र

☞ एमएचटी-सीईटी २०१० या प्रवेश परीक्षेसाठी एकूण २,८५,२६३ पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश पत्रांचे वाटप करण्यात आले होते.

☞ प्रत्येक परीक्षा केंद्रावर आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच परीक्षेच्या दिवशी प्रत्येक परीक्षा केंद्रावर १४४ कलम सकाळी ६.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत लागू करण्यात आले होते.

☞ दिनांक ०६ मे, २०१० या दिवशी गुरुवार असल्याकारणाने सदरचा दिवस हा कार्यालयीन कामकाजाचा दिवस असल्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेस उशीरा येऊ नये याकरीता संचालनालयामार्फत सर्व वृत्तपत्रांमध्ये तसेच वृत्तवाहीन्यांवर सर्व विद्यार्थ्यांनी नियोजित

वेळेत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याच्या दृष्टीने घरातून नियोजित वेळेच्या किमान १ ते २ तास आधी निघावे असे आवाहन करण्यात आले होते.

☞ सदर प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

- ❖ परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या - २८५२६३
- ❖ प्रवेश परीक्षेस गैरहजर असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या - ३१७८
- ❖ प्रवेश परीक्षेस हजर असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या - २८२०८५

- महाराष्ट्रातील विभागवार विद्यार्थ्यांची उपस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| विभाग | एकूण विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | टक्केवारी (अनुपस्थित) |
|---|---|---|---|---|
| **उर्वरीत महाराष्ट्र** | १८४१९५ | १८२१२७ | २०६८ | १.१ |
| **मराठवाडा** | ४४३९६ | ४३९४१ | ४५५ | १.० |
| **विदर्भ** | ५६६७२ | ५६०१७ | ६५५ | १.२ |
| **एकूण** | **२८५२६३** | **२८२०८५** | **३१७८** | **१.१** |

**मुंबई विभागातील विद्यार्थ्यांची उपस्थिती खालीलप्रमाणे आहे.**

| शैक्षणिक वर्ष | विभाग | एकूण विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| **२०१०-११** | **मुंबई** | **३६३८३** | **३५७६७** | **६१५** | **१.९** |
| **२००९-१०** | | **३४४७५** | **३३६६४** | **८११** | **२.३** |
| **२००८-०९** | | **३१४५५** | **३०१७८** | **७३६** | **२.३** |
| **२००७-०८** | | **२९९३२** | **२९३४३** | **५८९** | **१.९** |

☞ एमएचटी-सीईटी-२०१० या प्रवेश परीक्षेचा निकाल **दिनांक १४ जून, २०१० पर्यंत** जाहिर करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या कार्यक्रमाबाबतची माहीती विद्यार्थी व पालकांकरीता वृत्तपत्रांमधून नोटीफीकेशनद्वारे जाहीर करण्यात येणार आहे.

☞ आरोग्य विज्ञान अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी ही सामाईक प्रवेश परीक्षा एकत्रित रित्या घेण्यात येत असली तरी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे प्रवेश हे वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालयामार्फत तर अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाचे प्रवेश हे तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत करण्यात येणार आहेत.

☞ सदर प्रवेश परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे व त्यानुसार तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांकडून प्रेफरन्स फॉर्म भरुन घेण्याची प्रक्रिया अंदाजित जून

महीन्याच्या शेवटच्या किंवा जूलै महीन्याच्या पहील्या आठवडयात घेण्यात येणार असून विद्यार्थ्यांनी भरुन दिलेला पंसतीक्रम आणि गुणवत्तेच्याआधारे आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी निवड करण्यात येईल.

☞ वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमासाठी भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली आणि बी. एससी. (नर्सिंग) अभ्यासक्रमासाठी भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांच्या वेळापत्रकाप्रमाणे दिनांक ३० सप्टेंबर, २०१० ही प्रवेशाची अंतिम तारीख जाहिर करण्यात आली आहे. सदर तारखेनंतर वैद्यकीय, दंत व बी.एससी. (नर्सिंग) अभ्यासक्रमासाठी कोणतेही प्रवेश केले जाणार नाहीत.

**सक्षम प्राधिकारी व संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**MEDICAL EDUCATION & DRUGS DEPARTMENT**
**DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH, MUMBAI**
**DIRECTORATE OF TECHNICAL EDUCATION, MUMBAI**

**MAHARASHTRA HEALTH SCIENCES & ENGINEERING COMMON ENTRANCE TEST**

# MHT-CET-2010

## PRESS NOTE

**Date : 06th May, 2010.**

☞ Government of Maharashtra has organized a common entrance test MHT-CET-2010 for admission to Health Science, Engineering & Pharmacy professional courses. The examination was scheduled on Thursday, 06th May 2010.

☞ The said examination was conducted at 740 centers at the 35 district head quarters in State of Maharashtra.

☞ The time table of the examination was as under

| Subject | Examination Time |
|---|---|
| Physics & Chemistry | 10.00 am to 11.30 am |
| Biology | 12.00 Noon to 1.30 pm |
| Mathematics | 3.00 am to 4.30 pm |

☞ The centers for the said examination were grouped under following categories.

| | | |
|---|---|---|
| 1. | For Health Sciences only | BB Center |
| 2. | For Engineering only | MM Center |
| 3. | For candidates opting for both Health Sciences & Engineering | MB Center |

☞ For MHT-CET 2010 total 2,85,263 eligible candidates were given admit cards.

☞ Instructions were issued to keep proper Police Bandobast at each Examination Centre. On the day of examination section 144 to be promulgated between 6.00 am at 8.00 pm to each examination centre.

☞ 06th May, 2010, Thursday being working day as a matter of concern, all the candidates were instructed through News Paper & News Channel to start about 1-2 hours from their homes so as to reach the examination centre in proper time.

☞ Attendance Report of State

- ❖ **Total number of candidates - 285263**
- ❖ **Candidates Present - 3178**
- ❖ **Candidates Absent - 282085**

- **Region wise Attendance report**.

| Division | Total Candidates | Candidates Present | Candidates Absent | Percentage of Absentee |
|---|---|---|---|---|
| Rest of Maharashtra | 184195 | 182127 | 2068 | 1.1 |
| Marathwada | 44396 | 43941 | 455 | 1.0 |
| Vidarbha | 56672 | 56017 | 655 | 1.2 |
| **Total** | **285263** | **282085** | **3178** | **1.1** |

**From Mumbai Division the Attendance of candidates was as under.**

| Academic Year | Division | Total No. of Candidates | Present | Absent | Percentage of Absent |
|---|---|---|---|---|---|
| 2010 - 11 | MUMBAI | 36383 | 35767 | 615 | 1.9 |
| 2009 -10 | | 34475 | 33664 | 811 | 2.3 |
| 2008 - 09 | | 31455 | 30178 | 736 | 2.3 |
| 2007 - 08 | | 29932 | 29343 | 589 | 1.9 |

☞ The result of MHT-CET 2010 shall be declared on or before 14th June, 2010. Later on, through notification in leading news papers, the programme of admission process shall be declared for information to the candidates and their parents.

☞ Though the Common Entrance Test is designed for Health Science, Engineering & Pharmacy courses, Admission to Health Science Courses shall be done by Directorate of Medical Education & Research & for Engineering & Pharmacy courses shall be done by Directorate of Technical Education.

☞The merit list of MHT-CET shall be used for preference form filling by the candidates. The said process shall be conducted around last week of June or the first week of July. The selection to Health Science Courses shall be as per merit & the Preferences given by the candidates.

☞ The Cut-off-date for admission to Medical, Dental and B.Sc. Nursing Courses as per MCI, DCI & Indian Nursing Council is 30th September 2010, No admission shall be done to these courses after Cut-off-date.

**Competent Authority and Director,**
**Medical Education and Research, Mumbai.**